प्रेस नोट

दि.२१/०५/२०१९

## कोरेगाव पार्क, पुणे येथील हुक्का पार्लरवर पोलीसांचा छापा व गुन्हा दाखल

कोरेगाव पार्क पो.स्टे.चे कार्यक्षेत्रात लेन नं.सी, तेजस्विनी बिल्डींगचे टेरेसवर अनधिकृतपणे हमजा शफिक रंगूनी नावाचा इसम हुक्का पार्लर चालवून तरूण तरूणींना हुक्का ओढण्यास देतो. तसेच हुक्का ओढण्यासाठी ज्वालाग्रही पेटते कोळसे पुरवितात. त्यामुळे जीवीतहानी होण्याची शक्यता आहे, अशी बातमी मिळाली.

नमूद बातमीवरून श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर, कल्याणी शिंदे, महिला पोलीस उप निरीक्षक व कोरेगाव पार्क पो.स्टे. कडील स्टाफने दि.२०/०५/२०१९ रोजी १९.३० वा. नमूद ठिकाणी छापा घातला असता सदर ठिकाणी ग्राहक हुक्का स्पॉट व पाईपचे साहाय्याने हुक्का ओढत असताना दिसले. सदर बिल्डींगचे टेरेसची पाहणीमध्ये (१)हमजा रंगूनी (२) आरकिशीता जुला मलिक यांनी संगनमत करून ग्राहकांना बेकायदेशीर, बिगर परवाना हुक्का ओढण्यासाठी हुक्का फ्लेव्हर व त्याचे साहित्य पुरवून लोखंडी शेगडीमध्ये कोळसा पेटवून शेगडीमधील पेटता निखारा हा कामगाराकरवी हयगयीने व बेदरकारपणे पुरेशी काळजी न घेता ग्राहकांना हुक्का पिण्यासाठी शेगडीमधून लोखंडी/स्टीलचे चिमटयाचे साहाय्याने हुक्का पॉटचे चिलीमवर ठेवत असताना अ.क्र.२ हा मिळून आला. तसेच सदर ठिकाणी आग लागल्यास, आग विझवण्यासाठी कोणतीही अग्नीशामक यंत्रणा नव्हती. ग्राहकांना हुक्का ओढण्यासाठी ज्वालाग्रही पेटते निखारे पुरवताना धोका/दुखापत होवू शकतो व ज्वालाग्रही पेटते निखारे यांची ठिणगी पडून दुखापत होण्याची व आग लागून जीवीतहानी होण्याची शक्यता आहे, हे माहित असताना सुद्धा ज्वालाग्रही पेटते निखारे याचेबाबत हयगयी व बेदरकारपणे वर्तन करत असताना मिळून आले.

उपरोक्त हुक्का पार्लरचे मालक हमजा रंगूनी व मॅनेजर यांनी आपले टेरेसवर बेदकारपणे व हयगयीने ग्राहकांना हुक्का ओढण्यासाठी देवून त्याकरिता ज्वालाग्रही पेटते निखारे पुरवत असताना मिळून आले आहेत., म्हणून त्यांचेविरूद्ध कोरेगाव पार्क पो.स्टे.गु.र.नं.१७३/२०१८, भा.दं.वि.क.२८५, ३४ व सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात, प्रतिबंधक व पुरवठा व वितरण) अधिनियम सन २००३ चे कलम ४ (अ), २१ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री.बच्चन सिंग सो., पोलीस उप आयुक्त, परि.२, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर, पो.उप निरीक्षक, श्रीमती कल्याणी शिंदे व कर्मचारी दिनेश शिंदे, सागर जगताप, अमोल जाधव, महादेव धांडे, किरण बनसोडे यांनी केलेली आहे.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर